# जपानी पुष्परचना भाग ३

तिळगुळ घ्या आणि गोडगोड बोला
नवीन वर्षाच्या सर्वांना मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा !

थंडीचा कडाका जोरात चालू आहे. त्यामुळे गरमागरम बाजरीची भाकरी, वांग्याची भाजी, खमंग गुळाची पोळी, त्यावर साजूक तूप, तिळगुळ, हलवा तोंडाला पाणी सुटले ना ! १४ जानेवारीला आपण मकर संक्रात साजरी करतो. सूर्याचे उत्तरायण सुरु होते. दिवस हळूहळू मोठा व्हायला सुरुवात होते.

अनेक सण, अनेक आनंदाचे प्रसंग आपण वेगवेगळ्या पद्धतीने, कधी रूढीप्रमाणे तर कधी एखाद्याला सुचलेल्या नवीन कल्पनेनुसार साजरे करतो. पुष्परचनेच्या माध्यमातूनही सण आणि प्रसंग मांडता येतात. यावेळी मकर संक्रात या सणाचे प्रातिनिधीत्व करणाऱ्या रचना पाहणार आहोत.




रचना १ मध्ये मातीचा फ्लॉवर पॉट वापरला आहे. आता सुगीचे दिवस - शेतात कणसे तयार झालेली असतात. त्यामुळे यात बाजरी आणि ज्वारीची कणसे वापरली आहेत. लाल अँथॉरियम व पिवळी शेवंती यांच्या रंगाच्या विरोधाभासातून सौंदर्य निर्माण होत आहे. कणसांचा रंग थोडा मंद आहे. त्याला खुलवण्यासाठी हिरवी पामची पाने मदत करत आहेत. पांढरे छोटे छोटे हलव्याप्रमाणे दिसणारे बेबीज ब्रेथ एकूणच रचनेला छान उठाव देत आहे. कणसे व अँथोरिअम मुद्दाम वेगवेगळ्या उंचीचे लावले आहेत.

रचनेतील उंची, रंग, नाज़ूक फुलांचा वापर, पाठीमागचा काळा रंग हे सर्व एकमेकांना पूरक व समतोल साधणारे असावे असा विचार रचना करताना केला आहे.




रचना २ मध्ये पपईचे पान, जांभळ्या रंगाची डेझी, ग्लॅडिओलाची पाने आणि बेबीज ब्रेथ वापरले आहे. संक्रातीला काळे कपडे / साड्या परिधान करायची रूढी आहे. त्यामुळे काळ्या पडद्यावर पांढरे ठिपके अशी कल्पना केली आहे. बेबीज् ब्रेथची पांढरी फुले म्हणजे जणू पांढरे हलव्यासारखे ठिपके. पपईचे पान फार कोणी रचनेत वापरात नाही. पण मी प्रयत्न केला आहे. पानाचा आकार व नक्षी किती सुंदर आहे. पांढरा व हिरवा रंग यामध्ये छोटेसे नाजुकसे डेझीचे फुल स्वतःचे अस्तित्व दाखवत आहे. भातुकलीच्या खेळातील अगदी छोटे पितळ्याचे भांडे पुष्पपात्र म्हणून वापरले आहे.

३ ऱ्या रचनेमध्ये मातीचे अगदी छोटे बोळके-सुगड किंवा खण म्हणतात. त्यात उसाचे तुकडे, गाजर, बोरे, गव्हाच्या ओंब्या भरून सुगडाची पूजा केली जाते. या रचनेत ते सुगड व चूल दाखविली आहे. तीन दगडाची चूल मांडून त्यावर छोट्या मातीच्या सुगडामध्ये नाज़ूक फुले पाने लावली आहेत. चुलीमध्ये असलेली लाकडे म्हणजे गोकर्णाच्या वेलीच्या वाळलेल्या शेंगा आहेत.




कश्या वाटताहेत या रचना व त्यामागची कल्पना ? करून पहा - तुम्हालाही अजून खूप वेगळ्या नवीन कल्पना सुचतील. तुमचे अभिप्राय व सूचना जरूर पाठवा.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

( M.Sc. M.Phil. Chemistry )

व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो इकेबाना, पुणे शाखा

e-mail - asdssd@gmail.com